सकाळ TODAY

कोल्हापूर, सोमवार, १८ ऑगस्ट २०२५



कोल्हापूर : सृजन आनंद विद्यालयात आयोजित 'चला डोक्यात दगड भरूया' प्रदर्शनात दगडांची माहिती देताना विवेकानंद महाविद्यालयातील प्रा. डॉ. अभिजित पाटील.

# सृजन आनंद विद्यालयात 'चला डोक्यात दगड भरूया' प्रदर्शन

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील प्रा. डॉ. अभिजित पाटील यांचे 'चला डोक्यात दगड भरूया' या दगडांवर आधारित प्रदर्शनाचे सृजन आनंद विद्यालयात आयोजन केले होते. स्वातंत्र्यदिनानिमित्त ते भरवले होते. डॉ. पाटील व प्रा. योगिता पाटील यांच्या संग्रहातील अग्निजन्य खडक, स्तरित खडक, रूपांतरित खडक, स्फटिके, प्रवाळ असे अनेक दुर्मीळ दगड मुलांना पाहायला मिळाले. वनस्पतीजन्य जीवाश्म, प्राणीजन्य जीवाश्म, डायनासोरच्या हाडांचे जीवाश्म प्रदर्शनात ठेवले होते. विद्यालयातील मुलांच्या संग्रहातील दगड, शंख, शिंपले, पक्ष्यांची पिसे, किचेन्स, गाड्या, चित्रसंग्रह, वनस्पतींची पाने, वेगवेगळ्या धबधब्यांचे पाणी, जुन्या पितळी वस्तू, ग्रामोफोन, रेकॉर्डसचे ८० संग्रह प्रदर्शनात होते. प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी तमिळ, हिंदी, कानडी, गुजराती, बंगाली, मराठी भाषांमधील गाणी विद्यार्थ्यांनी सादर केली.